# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in Web Site : - www.ropune.org.in


जा.क्र.तंशिविकापु/विवि-१/३३ कोटी वृक्षलागवड/२०१९/ 3713

**अत्यंत महत्वाचे :** दिनांक : 0 / SEP 2019

प्रति,
संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखाली
असलेल्या **पुणे/सातारा/सांगली/कोल्हापर व सोलापूर** जिल्हयातील
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित पदविका तसेच
व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था.

**विषय :- १ जुलै ते ३० सप्टेंबर २०१९ या कालावधीमध्ये ३३ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत.**

संदर्भ :- १. या कार्यालयाचे पत्र जा.क्र.तंशिविकापु/विवि/३३ कोटी वृक्षलागवड/२०१९/३०७१, दि. २५.०७.२०१९.
२. मा. विभागीय आयुक्त, विधान भवन, पुणे यांचे दालनात दि. ०६.०८.२०१९ रोजी झालेली आढावा बैठक.
३. मा. जिल्हाधिकारी पुणे यांनी, उपवनसंरक्षक यांचे दालनात दि. ०७.०८.२०१९ रोजी, घेतलेली आढावा बैठक.
४. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक:१६/आस्था/संकीर्ण/२०१९/२४३, दि. २४.०७.२०१९.
५. महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र : साववि-२०१८/प्र.क्र.११८/फ-११, दि. १६.०७.२०१९.
६. वित्त आणि नियोजन, वने महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांचे दि. १२.०७.२०१९ रोजीचे पत्र

उपरोक्त विषयाच्या संदर्भ क्र. ४ ते ६ येथील पत्रास अनुसरुन, ५० कोटी वृक्षारोपण व संगोपन कार्यक्रमांतर्गत सन २०१९ मध्ये ३३ कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट वेळेत पूर्ण व्हावे तसेच सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी करतांना कोणत्या घटकांकडे विशेष लक्ष पुरवावे, याबाबत मा. मंत्री वित्त नियोजन व वने यांनी दिनांक २१.०६.२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविलेनुसार, या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व शासकीय अशासकीय अनुदानित तसेच विनाअनुदानित संस्थांना दिलेल्या उद्दिष्टानुसार वृक्ष लागवड करुन त्याबाबतची माहिती वन विभागाच्या **www.greenarmy.mahaforest.gov.in** या संकेतस्थळावर (फोटो व व्हिडिओसह) अपलोड करावी याविषयी या कार्यालयाने आपणांस वेळोवेळी सूचित केलेले आहे. परंतु असे निदर्शनास आले आहे की, काही संस्था वगळता अद्यापपर्यंत ब-याच संस्थांनी दिलेल्या उद्दिष्टानुसार वृक्ष लागवड केलेली नाही तसेच काही संस्थांनी दिलेल्या उद्दिष्टानुसार वृक्षलागवड केली आहे परंतु याबाबतची माहिती वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर अपलोड केली नाही हे **अत्यंत खेदाने** नमूद करावे लागत आहे. सबब महाराष्ट्र शासनाच्या ३३ कोटी वृक्ष लागवडीच्या उद्दिष्टपूर्तीच्या अनुषंगाने, आपल्या संस्थेसाठी निश्चित केलेले उद्दिष्टपूर्तीचे प्रमाणपत्र वनविभागाकडून ऑनलाईन प्राप्त करुन घेवून सदरचे प्रमाणपत्र आपल्या संस्थेच्या प्रवेश याद्या पडताळणीच्या वेळी स्वतंत्ररित्या या कार्यालयास सादर करावे अन्यथा गुणवत्ता यादी तपासणी जाणार नाही असे या कार्यालयाचे पत्र जा.क्र.तंशिविकापु/विवि/पदविका प्रवेश गुणवत्ता यादी तपासणी २०१९-२०/२०१९/३६२४ दि. ३१.०८.२०१९ अन्वये, यापूर्वी आपणास कळविलेले आहे.

(कृ.मा.प.)

**वृक्ष लागवड हा शासनाचा महत्वाकांक्षी व समाजाच्या हितासाठी आखलेला उपक्रम असल्यामुळे, या कार्यक्रमाची राष्ट्रीय पातळीवर अंमलबजावणी होत आहे.** दि. ०६ ऑगस्ट, २०१९ रोजी, मा. विभागीय आयुक्त, विधान भवन, पुणे येथे वृक्ष लागवडीबाबत झालेल्या तसेच दि.०७ ऑगस्ट, २०१९ रोजी, मा. जिल्हाधिकारी पुणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत याबाबत आढावा घेण्यात आलेला असून, या तंत्र शिक्षण विभागांतर्गत अतिशय कमी प्रमाणात वृक्ष लागवड झाली असल्याने व त्याची माहिती वनविभागाच्या संकेतस्थळावर अपलोड केली नसल्याने, याबाबत गंभीर नोंद घेण्यात आली असून, संबंधित संस्थांना कठोर निर्देश देण्याबाबत सूचित करण्यात आलेले आहे. सबब सर्व संस्थाप्रमुखांना या पत्राव्दारे पुन्हा सूचित करण्यात येते की, या विभागास दिलेले जिल्हानिहाय उद्दिष्ट वेळेत पूर्ण व्हावे यासाठी, आपल्या संस्थेस नेमून दिलेल्या उद्दिष्टा इतके किंबहुना त्यापेक्षा जास्त वृक्ष लागवड करुन, **निर्धारीत वेळेच्या आधी वृक्ष रोपणाचे उद्दिष्ट पूर्ण करुन त्याबाबतची माहिती वनविभागाच्या वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर लवकरात लवकर अपलोड करुन, त्याबाबतचे ऑनलाईन प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे..** याकरीता आपल्या संस्थास्तरावर एका **समन्वयकाची** नियुक्ती करावी. याविषयी काही अडचण आल्यास, आपल्या जिल्हयाच्या वनविभागाच्या अधिकारी / कर्मचारी यांचेशी संपर्क साधून मार्गदर्शन घ्यावे.

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता.